नियमित खटला क्र.१०९५/२०२०
शासन वि मोहम्मद तौसीफ
नि.क्र.३०

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **नांव** | **–** | **रशाद खलील अंसारी,** |
| **वय** | **–** | **२५ वर्ष,** |
| **धंदा** | **–** | **खाजगी** |
| **राहणार** | **–** | **रा. मोमीनपूरा, नागपूर.** |

**सरतपासणी–सरकारी वकील श्रीमती ममता आवारीवार यांचेमार्फत सुरु:–**

१. दिनांक ०४.०२.२०१८ रोजी मी गणेशपेठ पोलीस स्टेशन मध्ये गेलो होतो. तेथे मी काही कागदपत्रांवर सही केली. मी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकामी घटनास्थळावर गेलो नव्हतो. आता मला दिनांक ०४.०२.२०१८ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनु क्र.२ वर माझ्या सहया असून त्यातील मजकूराबाबत मला काहीएक कल्पना नाही. त्यास सहीपुरते अनुक्रमे **निशाणी क्र.पी–३१ व ३२/सा.क्र.१** देण्यात येते.

**(सरकारी वकीलांनी साक्षीदार हा त्याचे पूर्वीच्या जबाबाच्या विपरीत साक्ष देत असल्याने व सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याने साक्षीदाराची भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उलट तपासाची परवानगी मागितली. परवानगी दिली).**

२. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी मला पोलीसांनी वुडलॅंड हॉटेलच्या समोर ए. जे. बेल्टींग प्रायव्हेट लिमिटेड समोरील सार्वजनिक रोडवर बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी घटनास्थळ आम्हाला फिर्यादी

सलमान यांनी दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटनास्थळावर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ व मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादने पोलीसांना सदरच्या घटनास्थळावर आरोपीने त्यांच्या कडील दहा हजार रूपये व एमआय नोट–४ मोबाईल काढून घेतला होता असे कथन केले. मी सर्व आरोपींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करून त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखत असल्यामुळे त्यांना वाचविण्साठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास वकील श्री. पराग उके यांचे मार्फत:–**

**उलट तपास नाकारला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Location: Nagpur
Date: 2025.07.21 17:41:33 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेष मराठे)**

**दि. २१/०७/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर**

**कोर्ट क्र.१**

नियमित खटला क्र.१०९५/२०२०
शासन वि मोहम्मद तौसीफ
नि.क्र.३३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **नांव** | **–** | **विक्रम कैलाससिंग ठाकूर,** |
| **वय** | **–** | **३० वर्ष,** |
| **धंदा** | **–** | **खाजगी** |
| **राहणार** | **–** | **रा. संत्रा मार्केट, नागपूर.** |

**सरतपासणी–सरकारी वकील श्रीमती ममता आवारीवार यांचेमार्फत सुरु:–**

**१.** मी न्यायालयात हजर असलेल्या आरोपींना ओळखत नाही. घटना नक्की केव्हा व कोठे घडली हे मला माहिती नाही. पोलीसांनी माझे जबाब नोंदविले नव्हते.

**(सरकारी वकीलांनी साक्षीदार हा त्याचे पूर्वीच्या जबाबाच्या विपरीत साक्ष देत असल्याने व सरकार पक्षास सहाय्य करत नसल्याने साक्षीदाराची भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उलट तपासाची परवानगी मागितली. परवानगी दिली).**

२. आता मला दि.०४.०२.२०१८ रोजीच्या पोलीसांना दिलेल्या जबाबामधील अधोरेखित भाग अ वाचुन दाखविण्यात आला. त्यामध्ये नमुद केले प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>आरोपीतर्फे उलटतपास वकील श्री. पराग उके यांचे मार्फत:–</u>

उलट तपास नाकारला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Location: Nagpur
Date: 2025.07.21 17:41:41 +0530

नागपूर. (कौस्तुभ नागेष मराठे)

दि. २१/०७/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर

कोर्ट क्र.१